**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==========================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**
==========================================================

# संतसाहित्याची प्रासंगिकता

**डॉ. विद्यासागर पाटंगणकर**
से. नि. पदवी -पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, माजी उपप्राचार्य बलभीम महाविद्यालय, बीड .

संतसाहित्य हे विविधांगी आहे, म्हणूनच संयोजकांनी" आंतरविद्याशाखीय" भूमिका घेऊन संत साहित्याची प्रासंगिकता शोधण्याचा या निमित्ताने हा प्रयत्न केला आहे . यातील उपविषयांकडे पाहिले, तरी संत साहित्याची सर्वसमावेशकता आणि व्यापकता तसेच प्रस्तुतता आपले लक्ष वेधून घेते . संतांनी जीवन तुकड्या तुकड्यांनी पाहिले नाही . त्यांच्या दृष्टीसमोर समग्रजीवन पूर्ण समग्रतेने प्रकट होत असावे . म्हणूनच संत साहित्य कालनिबद्ध असूनही कालातीत, स्थलातीत आहे . त्यांच्या समोर माणूस त्याच्या समग्रतेसह उभा आहे ! धर्म -,संस्कृती विज्ञान, साहित्य, संगीत, तत्वज्ञान, सामाजिक मूल्यविवेक, विद्रोह, विविध साहित्य प्रकार, आचार - विचारांतील समन्वय, पर्यावरण, एकूणच जीवनाच्या अंगोपांगांचा विचार त्यातून अभिव्यक्त होतो. म्हणूनच संतसाहित्यात वैश्विकता दिसते !

संत साहित्या कडे भिन्न भिन्न दृष्टीने पाहणारे अभ्यासक कोणी त्यातील सौंदर्यदृष्टीचा विचार करतात, कोणी विदग्ध रसवृत्तीचा, कोणी भाषिक वैविध्याचा, कोणी सांगीतिकतेचा, कोणी सामाजिक फलश्रुतीचा, कोणी तत्वज्ञानाचा, कोणी प्रबोधनाचा तर कोणी लौकिकतेचा - आणि कोणी अलौकिकतेचा विचार करतात ; आणि हे सर्वच दृष्टिकोण प्रस्तुत आहेत ! संतसाहित्य हे सर्वच दृष्टिकोणांना सामावून घेऊन पुन्हा " दशांगुळे उरलेच" आहे ! परिपूर्णार्थाने संत साहित्याचे समग्र आकलन आजही झालेले नाही ! हेच त्याचे सामर्थ्य आहे ! आजच्या समकालीन साहित्यावरही त्याचा प्रभाव जाणवतो . म्हणूनच आधुनिक काळातील सुंठणकर, राजवाड्यांपासून ते आजच्या करंदीकर दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, नेमाडे यांच्या पर्यंत विविध अभ्यासकांनी संतसाहित्याची कास धरलेली आढळते

**साहित्य आणि संस्कृती :**

साहित्य आणि संस्कृती यांच्यात एक घट्ट अनुबंध आढळतो . संस्कृतीचे वहन साहित्यातून होत असते ,मात्र श्रेष्ठ साहित्य केवळ त्याचे वाहक नसते ! मराठी भाषा मराठी माणूस आणि मराठी संस्कृती यांची एक घट्ट वीण संतसाहित्यातून असलेली दिसते . संस्कृतीचा उगम आणि तिची वाढ नद्यांच्या तीरी झालेली दिसते . म्हणून नदी आणि संस्कृती ही एकात्म जोडणी आहे . संत ज्ञानेश्वरांनी" संस्कृताची तीरे गहने" या शब्दाने संस्कृती आणि नदी यांचा अनुबंध सूचित केला आहे . मराठीसंतसाहित्य आणि मराठी संस्कृती विकसित झाली ती या गोदेकाठी ! दक्षिणगंगा गोदावरीच्या अंगाखांद्यावर मराठीने बाळसे धरले आणि अध्यात्माचे शिवधनुष्य पेलले ! गोदावरीच्या उगमासाठी गौतम ऋषीची तपश्चर्या तर मराठी साहित्य निर्मितीसाठी संतांची तपःपूत वाणी कारणीभूत ठरली !

**संतांची प्रेरणाः**

मराठीसंतसाहित्य यादवकाळात निर्माण झाले, त्यामागे प्रेरणा होती ती जनसामान्यांच्या उध्दाराची ! तहानलेल्या प्राण्या साठी जसे जगात पाणी निर्माण झाले तसेच दुःखी कष्टी, समाजासाठी संतसाहित्य प्रकटले ! माऊली म्हणतात -"

किंबहु नाआर्ताचिया लागी । पाणी आराइले असे जगी । तैसे दु:खिताचे भागी जिणे जयाचे " ।

संत आणि संतसाहित्य हे अभिन्न आहे संतांच्या जगण्याचा जो उद्देश तोच त्यांच्या काव्यनिर्मितीचा हेतू आहे ! संतवाणी आणि नदीचे पाणी यातील समान सूत्र "आर्तता" आहे ! पाण्याने तहान भागते तर संतवाणी दु:खार्त, शोकार्त समाजाला आपल्या अमृतमयवाणीने नवजीवन प्रदान करते !

मध्ययुगीन काळ हा धर्म संप्रदायाच्या प्रभावाचा काळ होता . या काळात तांत्रिक, कापालिक, शाक्त, शैव , वैदिक कर्मकांड, यांचा प्रभाव होता . सामान्य माणूस संभ्रमावस्थेत जगत होता, आद्यकविकीर्ती मुकुंदराजम्हणतात - " खंड ज्ञान उपदेशिती । मोक्ष तो उधार घालिती"

संत ज्ञानदेवांपूर्वी एक शतक असलेल्या मुकुंदराजाच्या काळातील धार्मिक गोंधळाची स्थिती नंतर वाढतच गेली, वैदिक यज्ञात पशुहत्येचे समर्थन होऊ लागले, वामाचार आणि पंच मकार हाच धर्म झाला; नाथपंथातील मत्सेंद्रनाथ कदली बनातील स्त्रीराज्यात अडकले होते एवढेच उदाहरण पुरेसे आहे ! धर्मक्षेत्रात पाखंड, अनाचार, कामाचार आणि कर्मकांडाचा वाढता प्रभाव आणि त्यामुळे झालेली सामान्यांची घुसमट हीच संत साहित्याची प्रेरणा ठरली ! सामान्यांच्या मुक्तीचा मार्ग दाखवून त्यांनी एक ऐतिहासिक आणि भाषिक - सांस्कृतिक क्रांतिकार्य केले !

**मुक्तीची संकल्पना :**

यादवकालीन समाजरचना ही पारंपरिक पद्धतीची उतरंड होती . उद्योग, व्यवसाय, विनिमय यात सरंजामशाही मानसिकता होती. " "जात " ही अपरिवर्तनीय असल्याने व्यक्तिविकास, व्यक्तिस्वातंत्र्य कल्पनातीत होते. ही बंदिस्त चौकट मोडणे त्या काळात अशक्यच होते ! व्यवसायही जातिविशिष्ट होता, या जन्मजात बंदिवासातून" मुक्ती" या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्याचे काम संतांनी केले ! मानसिक गुलामगिरीहीच खरी परवशता !"

" एका हाती टाळ । दुसऱ्या हाती मोक्ष"

असा मोक्ष त्यांनी प्रत्यक्षात आणला . मोक्ष ही मृत्यूनंतरनव्हे, तर जिवंतपणी अनुभवता येणारी बाब आहे, हे संतांनी ठायी ठायी सांगितले .

" मुक्तीतें परो सर म्हणती" किंवा" न लगे मुक्ती आणिसंपदा" तसेच" मुक्तीचा तोडर भक्तीपायी लोळे । भक्ताचे सोहळे देव भोगी" या सारखे उल्लेख सहज करता येतील !

श्रीसंत ज्ञानदेवांच्या प्रेरणेने आणि श्रीसंत नामदेवांच्या पुरस्काराने जे भक्तिआंदोलन झाले त्यातूनच संत साहित्याला बहर आला . जन्मजात श्रेष्ठ - कनिष्ठत्वाच्या कल्पनेलाच त्यांनी हादरा दिला . गीता आणि भागवत या ग्रंथातील उक्तींचा आधार घेऊन माणुसकीच्या दुर्लक्षित विचारांना त्यांनी केंद्रस्थानी आणले ! परंपरेतील अलक्षित परंतु मूल्यवान विचारांना मध्यवर्ती स्थान देऊन एकीकडे परंपरा पालन आणि परंपरे विरुद्ध बंडही पुकारले, यात मानवतावादाचे सूत्र त्यांनी बळकट केल्यामुळे त्यांच्या भक्ति आंदोलनाला समाजमान्यता - लोकमान्यता मिळाली व ते बहुमुखीझाले !"

" म्हणौनि कुळ जातिवर्ण । हे आघवेचि गा अकारण ।
एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक " ।"

ही ज्ञानेश्वरोक्ती बंदिस्त जातीय चौकटीच्या विरोधात उभ्या राहिलेल्या भक्ति आंदोलनाचा प्रकट -उघड जाहीरनामाच ठरली !

" न यस्य जन्मकर्माभ्यां न वर्णाश्रम जातिभिः" हा भागवत ग्रंथातील नवनारायण संवादातील विचार आणि " अपिचेत् सुदुराचारो भजते माम् अनन्यभाक" हा गीतेतील विचार या मागे आहे ! व्यक्तीच्या जन्मजात अस्तित्वा ऐवजी कर्म श्रेष्ठ होय ! चर्मा पेक्षा कर्माला प्राधान्य म चक्रधरांनीही दिले आहे !" कर्मचांडाळापासी जात चांडाळ चांग" ही त्यांची उक्ती हेच सांगते ! आत्मोन्नतीची नवी प्रेरणा - नवे आत्मभान संतांनी दिले ! चामा पेक्षा नामाला आणि चर्मा पेक्षा कर्माला महत्व देताना श्रीसंत ज्ञानदेव म्हणतात :

" राजाज्ञेचि अक्षरे आथी । ती चामा एका जया पडती ।
त्या चामासाठी जोडिती ।सकळ वस्तु । ।"

व्यक्तीच्या जगण्याला मूल्य प्राप्त करून त्यांनी ही आत्मजागृती केली ! हे फार मोठे परिवर्तन होते ! " ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा" म्हणणारे संत चोखोबा विटाळा परते आहे कोण ? असा परखड सवाल परंपरेला करतात - संत सोयराही हीच परिभाषा वापरते ! संतकवितेत संत स्त्रियांचे योगदान तेवढेच मोलाचे आणि लक्षणीय आहे !

" स्त्रीजन्म म्हणोनि न व्हावे उदास" अशी भाषा संत जनाबाई च्या तोंडी दिसते ! जगण्याचे नवे आश्वासन, नवे भान सर्वसामान्य माणसांना आणि स्त्रियांनाही प्राप्त झाले ही मोठीच किमया आहे !" भेदाभेद भ्रम अमंगळ" हे तुकोबा ठणकावून सांगतात !

जात हे वास्तव असले तरी जातिविशिष्ट उच्च नीचता मानसिक न्यूनगंड वा अहंगंड संत साहित्याने निष्प्रभ केला आणि माणसाला व्यक्तिगत आणि समाजगत असे दुहेरी मूल्य प्रदान केले ! हाच स्वातंत्र्याचा आविष्कार होय. भक्तीच्या क्षेत्रात जात पात, श्रेष्ठ कनिष्ठ ही उतरंड नाही, भक्तीत सर्व समान अधिकाराचे ! हीच परिवर्तनाची पहाट ! व्यक्तिगत जीवनात ती कोणीही असली तरी भक्तीच्या क्षेत्रात " जातीचा अहंकार ' वा न्यूनगंड विसरून ती एकमेकांच्या पायी लागतात, क्षेम देतात हे परिवर्तन संत साहित्याने घडवून आणले ! संत नामदेव एका अभंगात म्हणतात :

" लोखंडाचा विळा परिसा लागला । मागील त्या मोला मागूनये ।
दासी होती परि रायासी रतली । मागील ते बोली बोलो नये"

भागवतधर्माचे मंदिर या पायावर उभे राहिले ! श्रीसंत ना मा - ज्ञानोबा - चोखोबा - एकोबा -तुकोबा - निळोबा हा सर्व संत परिवार सामान्यांच्या मुक्तीचा उद्गार ठरला !

प्रत्येक जाती - धर्मात संत उत्पन्न झाले ! सोनार, शिंपी, साळी, माळी, कुंभार, न्हावी, तेली, दलित, मुस्लिम, अशा विविध जाती धर्मात संत उदयाला आले ! धुणी भांडी करणारी अनाथ - संत जनाबाई " दासीपण" मिरवताना दिसते ! गणिकेचा व्यवसाय करणारी कान्होपात्रा, संतत्वाची वाटचाल करते ! संत सोयरा स्वतःला" चोख्याची महारीण" म्हणते ! या संतस्त्रिया संतत्वाच्या दृष्टीने न्यून दर्जाच्या ठरत नाहीत ! जो नामदेव - ज्ञानदेवांचा अधिकार तेवढाच यांचाही अधिकार होय ! संत जीवनाने अध्यात्म क्षेत्रात केलेल्या क्रांती मुळे अद्वैत तत्त्वज्ञानाचा गाभाच प्रकट झाला !

**अद्‌वैतदृष्टी : -**

नाथसंप्रदाया कडून जी अद्‌वैत तत्त्वज्ञानाची दीक्षा भागवत संप्रदायाने घेतली, त्यामुळे एक नवी जीवनदृष्टी समाजाला मिळाली ! जीव -शिव ऐक्याच्या किंवा शिव - शक्ती समावेशनाच्या संकल्पने मागे अद्‌वैत दृष्टीच होती . संतांची वाणी आणि करणी यांच्यात अद्‌वैत होते ! आचार - विचार, कृती आणि उक्ती यांच्यात एकात्मता होती म्हणूनच याच एकात्म भावनेतून -"

" जे -जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत" यालाच त्यांनी भक्तियोग मानले ." तुका म्हणे एका देहाचे अवयव" ही एकात्म जाणीव सर्वच संतांनी समाजात पेरली !

प्रत्येक जीवमात्र जर ईश्वर असेल तर त्याची सेवा हीच ईशसेवा ठरते !" जन हेचि जनार्दन । जन जनार्दन ऐक्य जाण" असे म्हणणारे संत जनी जनार्दन - किंवा" " तीर्थी धोंडापाणी । देव रोकडा सज्जनी" । असे म्हणणारे संत तुकाराम समतावादा प्रमाणेच अद्‌वैताचेच पुरस्कर्ते ठरतात ! जनसेवा हीच ईशसेवा असल्याने "जगाच्या कल्याणा संतांच्या "विभूती" किंवा

" जगाचिया सुखोद्देशे ।
शरीर वाचा मानसे । राहटणे ते अहिंसे । रूप जाण"

अशी विश्वकल्याणाची भूमिका घेऊन माऊली अहिंसेची परिभाषा करतात ! हीच त्यांची जीवन्मुक्तीची संकल्पना !

जगताना समाजहितासाठी झटणे हीच जीवन्मुक्त स्थिती ।

" घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हाती । मुक्ता आत्मस्थिती सांडवीन" या परिभाषेचा अर्थ लक्षात घ्यावा ! एकट्याने ज्ञान मिळवून मुक्त होणे हे संतांना अपेक्षित नाही ! त्यांना सर्वांसह सत्कार्य करीत जगत्" कल्याण करायचे आहे !" तयांही कार्यकरणे । उरले असे लोकां लागी" असे ते म्हणतात !

**शाश्वत मूल्ये :**

संत साहित्याने" कर्मैईशु भजावा" किंवा" असाध्य ते साध्य करिता सायास"" यत्न तो देव जाणावा" अशा प्रकारचा जगण्यातील जिजिवीषा मांडली ! हे जगणे मायावादाच्या दृष्टीने न नाकारता" विश्वचैतन्यवादाचा पुरस्कार करून जगाच्या निमित्ताने ईश्वरच विनटलेला असल्याने जगणे निरर्थक नसून तेच सुंदर करण्याचे स्वप्न साकारले ! सत्य हाच ईश्वर असल्याने सत्याचा शोध हेच जीवनध्येय ठरले ! विश्व आणि विश्वंभर अभिन्न असल्याचे "अनध्यस्त "विवर्त" सारख्या संकल्पनेतून सांगितले . शाश्वत जीवनमूल्याचा वेध घेताना अहिंसा, नैतिकता, दया, प्रेम, सहानुभाव, आत्मौपम्य बुद्धी यांचा मूल्यविवेक केला !

सोवळ्या - ओवळ्याचा निषेध करताना, विटाळ ही देहनिष्ठ संकल्पना असल्याने देह अशाश्वत, क्षणिक असल्याने देहधर्मही आपोआपच व्यर्थ ठरले !" आत्मा तो केवळ शुद्धबुद्ध" ही धारणा आश्वासक ठरल्याने चैतन्य तत्वाचे स्फुरण प्रत्येकात असल्याने दैहिकभाव ,दैहिक भिन्नत्व गळून एकात्म दृष्टी सिद्ध झाली ." अद्‌वैताच्या गावी द्‌वैताचा दुष्काळ । प्रपंच उपाशी मेला रया ।" अशी भाषा संत निवृत्तिनाथ वापरतात . भावाद्‌वैत, क्रियाद्‌वैत आणि द्रव्याद्‌वैत अशी त्रिविध पातळीवरील अद्‌वैत सिद्धी हे खरे जीवनमूल्य संतांनी मानले !

वाग्यज्ञ सारख्या संकल्पनेतून निःस्वार्थ, निष्काम कर्मयोगाचा आदर्श माऊलींनी घालून दिला ! विश्वधर्म कल्पनेतून वैश्विक कल्याणाची मागणी केली !

**आंतरविद्याशाखीय भूमिका :**

संतांनी धर्म, संस्कृती, भाषा, समाज, व्यक्ती, कुटुंब, शाश्वत मूल्ये, साहित्य विचार, गीत - संगीत, तत्वज्ञान, भारतीय परंपरा या अशा अनेक विषयांना सहजस्पर्श केलेला दिसतो ! त्यांनी लोकभाषेचा स्वीकार केल्यामुळे त्यांचे नाते लोकजीवनाशी, लोकसाहित्याशी जुळताना दिसते . लोकछंद, लोकगीत सरणी त्यांनी सहज आत्मसात केली . ओवी - अभंग हे लोकछंद त्यांनी भावानुभव - विचारानुभव प्रकट करण्या करिता वापरले ."

" अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी" या उत्कटतेने ते प्रकटले . परतत्त्वस्पर्श हा साहित्याचा खरा उद्देश आहे माऊलीनी

" वाचे बरवे कवित्व । कवित्वी रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शू जैसा"

असे म्हटले आहे ! मराठी संत साहित्य हे अक्षर साहित्य असल्याने नेहमीच समकालीन राहिले आहे । संत साहित्यात सांगीतिक गुण सहजच असल्याने त्याचा सांगीतिक अंगाने विचार होऊ शकतो ! शब्द हा घटकही तेवढाच महत्वाचा ! त्यातून तत्कालीन जीवन विशेष, समाज संकेताचे दर्शन घडते ! अगदी आरोग्य विषयक चिंतना पासून ते मनोदर्शना पर्यंत सर्व विषय संतवाङ्मयात येऊन जातात ! ज्ञानेश्वरी कडे B.Ed च्या मेथडच्या पद्धतीनेही पाहणारे अभ्यासक आहेत !

**समारोप :**

मराठी संतांनी ""माणूस" केंद्रवर्ती मानला . त्याचे दुःख, दैन्य नष्ट करण्याचा वसा घेतला ." बुडती हे जन न देखवे डोळा" किंवा " न देखवे डोळा ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होते" अशी संवेदना प्रकट करून सामान्यांशी जीवाभावाचे नाते निर्माण केले ! सामान्य माणसाच्या उत्थानाचा विचार केला - त्यातून सहजपणेच साहित्य निर्मिती झाली !

मानवतावादाच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून संतसाहित्य निर्माण झाल्याने त्यात बुवाबाजी, ढोंगीपणा, धर्मलंडपणा यावर लगुड प्रहार केलेले दिसतात ! त्यातूनच उपहास परिहासाची ,उपरोधाची भाषा येते .

" मांजराचे गेले डोळे । उंदीर देखुनी तळमळे" ( ज्ञा )
किंवा
भगवे तरि -श्वान सहज वेष त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ ॥ (तु )

संतत्व हे पोशाखा वर नसून अंतर्यामीच्या सत्व आणि सत्यनिष्ठेच्या कसोटीवर टिकणारे असते !

" टिळा टोपी माळा गळा । म्हणती आम्ही संत ।
परस्त्री देखुनि झाले चंचल चित्त" ( ए )

संत जेणे व्हावे जग बोलणे सोसावे" आणि बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" ही त्यांची कसोटी होय !

अशा संतांनी काढलेले कणवपूर्ण उद्‌गार ते संतसाहित्य ! ज्ञानोत्तर भक्तीचा आदर्श मांडून भक्तीला त्यांनी समाजशील रूप दिले ! संत दासोपंतांनी गीतार्णवात " भजन" शब्दावर भाष्य करताना

" लोकसंग्रहा कारणे ।करणे आणिकरविणे ।
लोक सन्मार्गी लावणे । हेही माझे भजन ।"
अशी लोकाभिमुख भूमिका घेतलेली दिसते .

संत ज्ञानदेवांनी" विश्वमोहोरे लावण्याची" केलेली अपेक्षा लोकसेवेच्या व्रताची पावतीच होय ! संतांनी जीवनवादी - जीवनसंवादी दृष्टी ठेवून जी शिकवण दिली, जी भूमिका घेतली, त्याचा प्रभाव जनमानसावर आज सातशे वर्षानंतर ही आहे । मराठी माणूस आणि मराठी संतसाहित्य यांच्यात एक अतूट, एकात्म भावबंध निर्माण झाला आहे. मराठी संत मराठी माणूस आणि मराठी संस्कृती ही त्रिपुटी उरतच नाही ! त्रिपुटी नष्ट होते आणि फक्त ""मराठीपण", ""मराठी मन" तेवढे अधोरेखित होताना दिसते ! यातच मराठी संत साहित्याचे खरे रू अभिव्यक्त होताना दिसते ! हीच मराठी संत साहित्याची प्रासंगिकता आहे . पुनश्च सर्वांना धन्यवाद !